# 'साय-फाय करंडक'ची महाअंतिम फेरी पुण्यात

पुणे, ता. ६ : वाढते सायबर गुन्हे व सायबर सुरक्षेच्या जनजागृतीसाठी 'साय-फाय करंडक' या एकपात्री स्पर्धेची महाअंतिम फेरी १६ डिसेंबरला पुण्यात होणार आहे.

क्विक हिल फाउंडेशन, महाराष्ट्र सायबर विभाग व थिएटर अकादमी यांच्या वतीने आयोजित या स्पर्धेचे हे दुसरे वर्ष आहे, अशी माहिती याबाबत क्विक हिल टेक्नॉलॉजीचे व्यवस्थापकीय संचालक कैलास काटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी महाराष्ट्र सायबर विभागाचे पोलिस अधीक्षक सचिन पांडकर व थिएटर अकादमीचे प्रसाद पुरंदरे उपस्थित होते. स्पर्धेसाठी पुणे, गोवा, रत्नागिरी, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर येथून शंभरहून अधिक संघांनी प्रवेशिका पाठविल्या होत्या. पुणे, मुंबई वगळता विभागीय पातळीवरील स्पर्धा पूर्ण झाली आहे. मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या शाळा परिसरातील सकल ललित कलाघर येथे अभिनेता रितेश देशमुख याच्या प्रमुख उपस्थितीत महाअंतिम फेरी होणार असल्याचे संयोजकांनी सांगितले.